ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

IMPACT FACTOR 4.22

ISSN 2229-4406

*UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XV, Vol. XIII
Year - VIII (Half Yearly)
Sept. 2017 To Feb. 2018

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Suhas Avhad
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN & Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal, Ujwal Gramin Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY-EDITOR**

Dr. N. G. Mali
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *



# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Participation of Women of Amravati City in Schemes of Mahatma Phule Backward Class Development Corporation<br>**Dr. Prashant J. Katole** | 1 |
| 2 | The Influence of Non- Brahmin Movement in Vidarbha<br>**Dr. A. N. Farpat** | 23 |
| 3 | Impact of Media-Mixfor Rural Poor of Vidarbha: A Perspective<br>**Dr. Dharmesh V Dhawankar** | 28 |
| 4 | भूमंण्डलीकरण और हिन्दी उपन्यास<br>**डॉ. दिनेश जयस्वाल** | 37 |
| 5 | भारतीय अर्थव्यवस्थसमोरील आव्हाने<br>**बी. एस. केंद्रे** | 47 |
| 6 | उचल्या : एक चिकित्सा<br>**डॉ.नम्रता वागडे** | 51 |
| 7 | मानवाच्या सर्वांगीण विकासात संगीताची भूमिका<br>**डॉ. अर्चना सं. देशपांडे** | 55 |
| 8 ✓ | राजा बिज्जल व बसवेश्वर संबंध<br>**रत्नाकर बाबुराव लक्षटे** | 60 |



Scanned by CamScanner

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



8

# राजा बिज्जल व बसवेश्वर संबंध

*रत्नाकर बाबुराव लक्षटे*
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

**Research Paper - Poltical Science**

सरंजामी व्यवस्थेत राजा आणि त्याच्या दरबारात काम करणारे मंत्री, यांच्या सबंधाला विशिष्ट राजकीय संदर्भ असतात. राजा बिज्जल व बसवेश्वर या दोघांतील संबंधाविषयी स्पष्ट वक्तव्य करण्यापुर्वी, आपण त्यांचा स्वभाव, चारित्र्य, गुणवैशिष्ट्ये, धर्मभावना यांचा परिचय करून घेऊ. ज्यामुळे आपणास त्यांच्यातील संबंध जाणून घेण्यास मदत होईल.

बिज्जल हा मंगळवेढ्याचा मांडलिक संस्थानिक होता. 1130 पासून त्याने आपल्या कारकीर्दीस मंगळवेढ्यापासून सुरवात केली. व पुढे तो कल्याणचा सम्राट बनला. बिज्जल हा महत्वकांक्षी, धूर्त,मुत्सद्दी ,सत्तापिपासू, स्तुतीप्रिय, कच्या कानाचा, हितैषी स्वभावाचा व बाहुबली राजा होता. बिज्जल शैव धर्माचा होता की जैन धर्माचा या विषयीही बरेच वाद आहेत. बिज्जलाची राजमुद्रा, त्यांच्या मुलांचे नाव आणि त्या काळात सापडलेल्या शिलालेखावरून तो शैवधर्मीय होता असे म्हणता येईल. त्याच्या सहा मुलांपैकी तीन मुलांचे नाव शैवधर्मीय होते. उदा. सोमेश्वर, मल्लिकार्जून व संक्रम (शंकर) शिवाचे वाहन नंदी ही त्याची राजमुद्रा होती. इ.स. 1162 मधील बल्लिगवे व कुक्कनूर येथील शिलालेखावरुन बिज्जल हा शैवधर्मीय असल्याचे स्पष्ट होते. स्वतः बसवेश्वारांनीच बिज्जलाचा भवि (शिवभक्त) असा उल्लेख अनेकदा संभाषणातुन केला आहे.

बसवेश्वारदेखील शैव ब्राम्हण कुटूंबात जन्मले होते. त्यांचे आई व वडील शिवभक्त होते. बसवेश्वरांने वचनात आपण शिवभक्त असल्याचा उल्लेख केला आहे.

भव बंधनाचे दुःख नष्ट करण्यासाठी

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



ॐ नमः शिवाय मंत्राला शरण जाणे पुरेसे नाही का?
हर हर शंकर, शिव शिव शंकर, जय जय शंकर शरणागत झालो.
माझे पातक नष्ट करावे, कुडलसंगमदेवा मी शरण आलो.

बसवेश्वर म्हणजे शुध्द चारित्र्य, नैतिकता, मानवता, दया, बुध्दीनिष्ठता याची मुर्तीमंत कलाकृतीच होती. महात्मा बसवेश्वर बिज्जलासारखे सत्तापिपासू नसून उलट सत्ता व अधिकारांचा जनहितासाठी वापर करून राजेशाहीला लोकशाहीत व लोकशाहीला कल्याणकारी राज्याचा चेहरा प्राप्त करुन देणारे आदर्श राजनीतिज्ञ होते.

बसवेश्वर आणि बिज्जलाच्या कारकीर्दीची सुरुवात जवळपासचीच आहे. 1130 पासून बिज्जल मांडलिक ,म्हणुन तर बसवेश्वर 1132 पासून कोषागार विभागात सेवारत होते.ते दोघेही समवयस्क, समकालीन राजनितीज्ञ होते. दोघांत सत्तेचा वापर जनसेवेसाठी करावा का का स्वार्थ साधण्यासाठी करावा याबाबत दोघांत मतभेद होते. बसवेश्वर गणिताचे जाणकार, कायक निष्ठ, सेवाभावी, प्रामाणिक, राजनिष्ठ, देशभक्त, बुध्दीमान, चाणाक्ष सेवावृत्तीचे होते. कुडल संगम येथील ज्ञान साधनेमुळे त्यांच्यातील समाज प्रश्नाविषयीची जाण, सामाजिक बांधीलकी, अहिंसा, सत्यनिष्ठता इ. गुणांत अधिक भर झाली. उत्तम प्रशासकासाठी किंवा प्लेटोचा आदर्श / तत्वज्ञ राजा होण्यासाठीचे सर्व स्वभावगुण, लक्षणे बसवेश्वरांत होते. राजा बिज्जल आणि बसवेश्वर यांच्या संबंधाचे नेमके स्वरूप स्ष्ट करणे काहीसे कठीण आहे. पण संशोधकाने तत्कालीन घटनांची क्रमावली, राजकीय व सामाजिक परिस्थिती, दोघांच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे, त्यांचे राज्यातील, समाजातील स्थान, राज्य व समाजाविषयीची जाण, गुणधर्म, स्वभाव, चारित्र्य, राज्यातील पद इ. घटकांचा आधार घेवून या दोघांतील संबंधाना चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधकाच्या मताशी आपण सहमत व्हावेच असे नाही, पण संशोधकाच्या विचाराकडे तर्क, चिकित्सक वृत्तीने पहावे एव्हढाच त्याचा हेतु आहे.

संशोधकाने दोघातील संबंधांना स्पष्ट करण्यासाठी कांही गृहिते मानली आहेत.

1. तो कालखंड 12 व्या शतकाचा होता. तत्कालीन समाजमान्य तत्वे, राजांविषयीच्या दैववादी सिध्दांताचे प्रस्थ, विवेकवाद, वैज्ञानिकता व लोकशाही विचारांचा अभाव.
2. दोघांच्या स्वभावातील विरोधाभास.
3. दोघांच्याही ध्येयवादातील भिन्नता.
4. बिज्जल हा परंपरावादी शिवभक्त, बसवेश्वर सुधारणावादी शिवभक्त होते.

**दोघांच्या संबंधातील साधर्म्य व स्नेहाचे धागे :**

बिज्जल आणि बसवेश्वर यांच्या संबंधात जवळीकता, मित्रत्व, व विश्वासहार्यतेचे नाते निर्माण करणाऱ्या कांही बाबी अश्या.

Scanned by CamScanner

1. बसवेश्वरांनी अर्थ खात्यातील चुक लक्षात आणून देवून रोखलेला आर्थिक भ्रष्टाचार.
2. ताम्रपटाचे कथन करून सिंहासनाखाली असलेले गुप्तधन बिज्जलास मिळवून दिले.
3. मंगळवेढा व कल्याणमधील जनतेस कायकनिष्ठ बनवुन राज्याच्या आर्थिक भरभराटीस मदत करणे व बिज्जलाविषयी जनतेच्या मनात निष्ठेची भावना वाढीस लावणे.
4. बिज्जलाची मानलेली बहिण निलांबिकेशी विवाह करणे.

या घटनांपैकी पहिल्या 3 घटनांमुळे बिज्जलास आर्थिक फायदा झाला. राज्याची आर्थिक स्थिती सुधारली. तर चौथ्या घटनेमुळे दोघात राजकीय नातेसंबंध निर्माण झाले. बसवेश्वरांच्या विचार व कार्यास राजाश्रय लाभला. नात्याने बसवेश्वर बिज्जलाचे भाउजी झाले. यामुळे बिज्जल आणि बसवेश्वरांच्या संबंधात जवळीकता व सौहार्द टिकून राहिले.

मंगळवेढा व कल्याण राज्यास जी आर्थिक समृध्दता आली, जनतेत आपल्याविषयी प्रेमाची व निष्ठेची भावना निर्माण झाली, त्यास बसवेश्वर आणि त्यांचे कार्य जबाबदार आहे अशी बिज्जलाची धारणा होती. बसवेश्वरांच्या समाजप्रियतेचा, प्रामाणिकतेचा, पारदर्शि कारभाराचा फायदा कल्याणमधील आपल्या सत्तेची पाळेमुळे मजबुत करण्यासाठी झाला. शिवाय ते सदैव आपल्याशी एकनिष्ठ आहेत. म्हणून बिज्जलाने बसवेश्वरांना कल्याणला नेले. आपले नवसमाज निर्मितीचे ध्येय पूर्ण करण्यासाठी कल्याणसारखे मोठे क्षेत्र आणि बिज्जलाच्या राजकीय छत्राची आवश्यकता आहे. म्हणून कदाचित बसवेश्वर बिज्जलासमवेत कल्याणला गेले असावेत.

1153 ते 1162 या काळात बसवेश्वर कल्याणला बिज्जलाच्या सत्तेला स्थिर करण्यात, सत्तेचे अधिसत्तेत रूपांतर करण्यात, मांडलीकांची बिज्जलाच्या छत्रछायेस मान्यता मिळवून देण्यात बसवेश्वरांनी मोलाची भूमिका बजावली होती. तर बिज्जलाला बसवेश्वरांसारखा एकनिष्ठ, प्रामाणिक, कायकनिष्ठ, सहाय्यकाची व नुतन सत्तेला अधिसत्तेत रुपांतरीत करण्यासाठी लोकमान्यता असलेल्या सेवकाची गरज असावी यातुन दोघांमध्ये समन्वयाचे, सलोख्याचे, जवळीकतेचे, विश्वासाचे व एकोप्याचे संबंध निर्माण झाले. परंतु एकदा बिज्जलांना अधिमान्यता मिळाली व त्यांना बसवेश्वर प्रतिस्पर्धी वाटु लागले. परिणामी दोघात हळूहळू कालांतराने दुरावा निर्माण झाला.

**दुरावा निर्माण करणाऱ्या घटना :-**

राजा बिज्जल आणि बसवेश्वर यांच्या संबंधात दुरावा निर्माण करणाऱ्या कांही बाबी अश्या.

1. दोघांच्या वैचारिकतेतील तफावत.
2. दोघांतील विरूध्द स्वभाव प्रवृत्ती.
3. राज्य, प्रशासन व शासन यंत्रणेतील स्थान.
4. आंतरजातीय विवाहाची घटना.

बसवेश्वरांचे अस्पृश्य वस्तीत जाणे, त्यांच्या सोबत स्नेह भोजन करणे, अस्पृश्यांशी सलगीने

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

Scanned by CamScanner

वागणे; यामुळे बसवेश्वरांचे समाज मानसातील स्थान उंचावत होते. राजा असून जो मान, जी समाजप्रियता बिज्जलास नव्हती ती बसवेश्वरांस होती. बिज्जल स्वतः कच्च्या कानाचे, अविवेकी व विलासी वृत्तीचे होते. त्याच्या आवती भोवती वैदिक व कर्मठ विचारांच्या लोकांचे प्रस्थ होते. ते स्वतः परंपरावादी होते. तर बसवेश्वर सुधारणावादी, विवेकशील, राजा जनतेचा मालक नसून सेवक असतो अशी धारणा बाळगणाऱ्या विचाराचे होते. बिज्जल कालांतराने सत्ता व संपत्तीच्या नादात मदमस्त झालेल्या हत्तीप्रमाणे वागु लागले. आपल्या सत्तेला शह देण्यासाठी बसवेश्वरांची नवधर्माची चळवळ उदयास तर येणार नाही ना ? या विचाराने बिज्जल शेवटी-शेवटी चिंताग्रस्त झाले होते. परिणामी दोघांमधील अंतर वाढत गेले. राजा बिज्जल आणि बसवेश्वरांच्या संबंधात दुरावा निर्माण करण्यात तत्कालीन परिस्थितीचे ही योगदान आहे. बिज्जलाचा अविवेकीपणा, कच्च्या कानाची वृत्ती, बिज्जलाभोवतीचे कर्मठ लोकांचे कोंढाळे तर याउलट बसवेश्वरांची तत्वनिष्ठता, ध्येयवेडेपणा, प्रजाहितैषी दृष्टीकोन हया बाबी दोघात शत्रुत्व वृध्दींगत करण्यास सहाय्यभुत ठरल्या.

राजा बिज्जल व बसवेश्वरांच्या संबंधाविषयी संशोधकाने वेगवेगळे तर्क वितर्क मांडले आहेत. राजा बिज्जल व बसवेश्वरांच्या संबंधाबाबत सारांश रूपाने असे म्हणता येईल की, मंगळवेढ्यातील वास्तव्यात दोघांचेही संबंध सलोख्याचे तर कल्याणच्या वास्तव्यापासून दोघांच्या संबंधात वितुष्ट, तेढ, दुरावा निर्माण झाला. यास बसवेश्वरांचे समाजकल्याणाचे, सुधारणेचे वाढते कार्यबाहुल्य ही जबाबदार असावे. कारण कोणत्याही सरंजामशाही सत्तेला लोकशाही, समता, सामाजिक न्याय, शोषण मुक्तता ह्या मुल्यांचे वावडे असते.

आधुनिक युगातील सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात परिवर्तनाची नांदी ठरणारे विचार व कार्य बसवेश्वरांनी कल्याण नगरात 12 व्या शतकात सुरु केले होते. महात्मा बसवेश्वरांनी जगाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व साहित्य विषयक क्षेत्रात महत्वपूर्ण ठरणाऱ्या अनेक तत्वांची, संस्थाची, विचारांची देणगी जगाला दिली. यामध्ये प्रामुख्याने अनुभवमंटप, वचन साहित्य, इष्टलिंग, कायक ये कैलास, दासोह वगैरे याशिवाय समाज व राष्ट्र बांधणीस उपयुक्त ठरणारे, मानवता व नैतिकतेचा मुलामा असलेले रचनात्मक कार्यक्रम जगाला दिले.

## संदर्भ सूची :-

1) डॉ. शरदचंद्र देगलूरकर (प्रथमावृत्ती 2004) : संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ - श्री चंद्रशेखर एकनाथ महाराज देगलूरकर, देगलूर

2) डॉ. कण्णीकेरी शंकरराव (प्रथम संस्करण - 1991) : कबीर और बसवेश्वर तुलनात्मक अध्ययन - वाणी प्रकाशन, दिल्ली -

3) डॉ. अशोक कामत (1999) : महात्मा बसवेश्वर - काळ, व्यक्ती, वचन साहित्य

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
Dist.Nanded



आणि शरणकार्य - सत्संग प्रतिष्ठाण, पुणे -

4) माते महादेवी (अनुवादक - शालीनीताई दोडमनी) (प्रथमावृत्ती 1997) - कल्याणक्रांती - बसवधर्माचे महाजगद्गुरु पीठ कुडलसंगम ता.हुनगुंद जि.विजापूर.

5) R. C. Hiremath (1967) : Sri Basvesvara ! A Biography - Published in Sri Basveswara - A communication Volume - Bangalore.

6) डॉ. भगवानदास तिवारी (प्रथमावृत्ती - 2001) : विश्व मानव बसवेश्वर - बसव शांती मिशन प्रकाशन, धारवाड.

## ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर.

**ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी**

वैशिष्ट्ये :-

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.

२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.

३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

- संपर्कासाठी पत्ता -
प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
**ऑफिस फोन नं. - 02382 - 241913**
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner